ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष : १२ वे । अंक २ रा
-ऑगस्ट-सप्टेंबर - २०२१



## लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १ २ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २ ० २ १

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४ ३ १ १ ० ३.
मो. ९९०४००३९९८

UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

## लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक (भाग-२)

वर्ष १ २ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २ ० २ १

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●

डॉ. युवराज धबडगे प्रा. नागेश बोन्तेवाड

मराठी विभागप्रमुख मराठी विभाग

दगडोजीराव देशमुख महाविद्यालय, वाळूज, जि. औरंगाबाद

● संपादक मंडळ ●

डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. फुला बागूल
डॉ. अनिल गर्जे
डॉ. संजय सांभाळकर
डॉ. ताहेर पठाण
डॉ. वंदना महाजन
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. ममता इंगोले
डॉ. वामन जाधव
डॉ. यशवंत सोनुने

मूल्य : ३ ० ० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड,
जि. औरंगाबाद – ४ ३ १ १ ० ३. मो. ९ ९ ० ४ ० ० ३ ९ ९ ८

| | | |
|---|---|---|
| 17. | लोककवी-वादळवारा वामनदादा कर्डक यांच्या गीतांतील डॉ.आंबेडकरांचे सामाजिक व आर्थिक तत्वज्ञान : एक अनुभवाधिष्टीत अभ्यास<br>- प्रा.डॉ. विजयकुमार जी.वावळे | 63 - 68 |
| 18. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान<br>- प्रा. डॉ. गणेश मालटे, भागवत भास्करराव पाटील | 69 - 71 |
| 19. | वामनदादा कर्डक यांच्या गीतातील रमाई आणि सावित्रीबाई फुले<br>- प्रा. गौतम गायकवाड | 72 - 80 |
| 20. | कविंचे महाकवी : वामनदादा कर्डक<br>- प्रा. डॉ. संतोष हंकारे | 81 - 85 |
| 21. | वामनदादा कर्डक आणि आंबेडकरी विचार<br>- प्रा. डॉ. संदीप कडू माळी | 86 - 88 |
| 22. | वामनदादा कर्डक यांचे जीवन कार्य आणि आंबेडकरी चळवळीतील योगदान<br>- सखाराम बाबूराव शिंदे | 89 - 92 |
| 23. | शाहीर वामनदादा कर्डक व्यक्ती आणि कार्य<br>- डॉ. विठ्ठल केदारी | 93 - 95 |
| 24. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- डॉ. काकासाहेब रामराव सुरवसे | 96 - 100 |
| 25. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>- प्रा. दिलीप ज्ञानोबाराव भिसे | 101 - 105 |
| 26. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- पल्लवी भगवान साबळे | 106 - 109 |
| 27. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>- डॉ. अनिल बळीराम बांगर | 110 - 114 |
| 28. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>– संतोष विलास दिवे | 115 - 118 |
| 29. | लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य<br>- पंढरीनाथ हरी मोकळे | 119 - 121 |
| 30. | वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि वाङ्मय<br>- प्रा. डॉ. मीनाक्षी रा. देव | 122 -125 |
| 31. | वामनदादा कर्डक यांच्या गीतकाव्यातून येणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>- डॉ. विक्रम अभिमन्यू ओतारी | 126 - 129 |
| 32. | प्रगमनशील समाजभान व्यक्त करणारा लोककवी : वामनदादा कर्डक<br>- प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने | 130 - 134 |



# लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता

- डॉ. अनिल बळीराम बांगर
मराठी विभागप्रमुख
को. ए. सो. लक्ष्मी –शालिनी महिला महाविद्यालय, पेझारी,
ता. अलिबाग, जि. -रायगड
मो. नं. - ९०२८०९२११

---

वामन तबाजी कर्डक यांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ देशवंडी ता. सिन्नर, जि. नाशिक येथेझाला. वामनदादा कर्डक या नावाने प्रसिद्ध, हे मराठी शाहिर, कवी, आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते होते. त्यांनी 'वाटचाल '(गीतसंग्रह) 'मोहोळ' (गीतसंग्रह) १९७६ 'हे गीत वामनाचे, (गीतसंग्रह) १९७७ हे काव्यसंग्रह त्यांच्या नावावर आहेत आंबेडकरी चळवळीच्या प्रचार आणि प्रसारासाठी आपले उभे आयुष्य वेचणारे लोककवीम्हणजे वामनदादा कर्डकहोय. वामनदादांची पहाडी आवाजातील लोकगीते हजारोंचा जनसमुदाय ऐकताना दिसतो. ही किमया केवळ त्यांच्या आवाजाची नव्हे तर आशयाची आहे. वामनदादांची गीते लोक जीवनाचा वेध घेणारी आहेत त्यामुळे त्यात वक्तृत्वही आले आहे. पण हे वक्तृत्व उसने नाही ते लोक मनाला थेट भिडणारे आहे. शाळेची पायरी न चढणाऱ्या वामनदादांची ही लोकगीतातील शब्दांची सुसंस्कारित जडणघडण आहे

लोकगीत हे मराठीचे सौंदर्य मानले जाते तर शाहिरी काव्यामुळे किंवा लोक गीतामुळे मराठी कवितेचा उषःकालझाला. असे पेशवेकालीन शाहिरांना डोळ्यापुढे ठेवून समीक्षकांनी गौरविले आहे. पेशवाईच्या काळात मोठ्या प्रमाणात अस्पृश्यता आणि वेट बिगारी वाढली होती. स्त्रियांना त्या काळात कोणत्याच प्रकारचे सामाजिक स्थान नव्हते केवळ चूल आणि मूल एवढाच तिचा दर्जा होता. युद्धावर अनेक दिवस बाहेर काढणाऱ्या सैनिकासाठी पेशवाईतील शाहिरांनी स्त्रियांच्या शृंगाराचे भडक वर्णन करणाऱ्या चवचाल लावण्या लिहिल्या, शृंगारिक लावण्या लिहिण्यात अनेक शाहीर अडकले तर सामाजिक चळवळीचा वेध घेऊन लोक गीतकारही याच वेळी समोर आले त्यात शाहीर अमर शेख, लोककवी वामनदादा कर्डक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आदींचा समावेश होता.

महाराष्ट्रातील लोक कवींना समाज मनाची चिंता होती. लोकगीताच्या साठ वर्षाच्या कालखंडात परिवर्तनवादी भूमिका लोकगीतातून व्यक्त झाल्या. लोकगीतांमधून प्रामुख्याने कष्टकरी, कामगार, शेतकरी, मार्क्सवादी, स्त्रीवादी, दलितांचीचळवळ, स्वातंत्र्याची आणि संयुक्तमहाराष्ट्राची चळवळ, राष्ट्रवादाचा पुरस्कार आणि प्रामुख्याने माणसांचा आणि माणुसकीचा धर्म वृद्धीगंत करण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न झाले लोकगीतातून घडणाऱ्या समाजाचा मूलाधार प्रबोधन हा आहे. समाजातील विषमतेवर कोरडे ओढत वामनदादा कर्डक लोकगीतातून दाहक वेदना मांडतात

तुम्हाला चीड यावी तिची ठिणगी उडावी

भुकेल्या माणसाची भूक जाळीत जावी

कविता हीच आता जगाचे गीत व्हावी. वयाच्या विसाव्या वर्षापासून आपल्या साध्या सोप्या शब्दातून लोकभाषेतून शाहिरी रचना कवणे गीते याद्वारे लोककवी वामनदादा यांनी जनजागृती केली. वामनदादांची बहुतांश गीते ही लोकगीते आहेत त्यांच्या गीतावर महाराष्ट्रातील अनेक कवी मने पोसली आहेत. वामनदादांची गीते म्हणजे कोंडलेल्या मनाचा हुंकार आहे. अनेक गीतांमधील लोक जीवनाच्या प्रतिमा कर्डकांच्या साधनेची साक्ष देतात. वामनदादांच्या काव्य निर्मितीचा केंद्रबिंदू हा मानव होता. म्हणूनच वामनदादा म्हणतात,

'माणसा इथे मी तुझे गीत गावे
असे गीत गावे तुझे गीत व्हावे'

मानवता, समता, बंधुभाव, शील, करुणा, मैत्री या तत्त्वांवर दादांची लोकगीते आधारित आहेत आंबेडकरी भक्ती, दलित, शोषित, स्त्रीमुक्ती, जातीव्यवस्था, मनोरंजनातून प्रबोधन या विषयावरही वामनदादांची लोकगीते आजही प्रभावी वाटतात. चळवळीच्या अशा असंख्य गाण्या बरोबरच वामनदादा कर्डक यांनी पर्यावरण, हुंडाबंदी, ऊसतोड कामगार, दुष्काळ अशा भिन्न विषयावर मोठ्या प्रमाणात लेखन केले आहे. संत तुकाराम महाराज यांच्या अभंग रचनेचे मूळ प्रेरणास्थान जसे विठ्ठल होते. त्याचप्रमाणे लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीत रचनेचे मूळ प्रेरणास्थान डॉ बाबासाहेब आंबेडकर होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या प्रचंड शक्तीने समाज तळ ढवळून निघाला रूढीचा सहारा करून व आत्मतेज याची पखरण करून समाजरथ पुढे जाऊ लागला तेव्हा वामनदादा उद्गारले.

मिळेल तितुके बलुते घेऊ |आणि खरकटे उरले खाऊ
काय म्हणुनी जीवन असले | जगशी रे आता?

वामनदादांची गीते चित्रपटातूनही गाजली 'चल ग हरिणी तुरु तुरु', 'सांगा या वेडीला, माझ्या गुलछडीला' यासारखी गाणी आजही ओठावर ताल धरतात. वामनदादा कर्डक १९३४ मध्ये मुंबईला गेले तेथे त्यांना चांगली नोकरीही मिळाली पण तिथे त्यांचे मन रमले नाही. अनेक कामे केली त्या काळी मुंबईत डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक चळवळीचे दिवस होते वामनदादा कर्डक डॉ. आंबेडकर यांच्या सभा मन लावून ऐकत. या स्फूर्तीतूनच वामनदादा पुढे समता सैनिक दलाचे कार्यकर्ते झाले आणि त्यांनी भीम कार्यात स्वतःला वाहून घेतले. वामन दादांनी आपल्या असंख्य अवीट लोकगीतांनी समाजमनाला भुरळ घातली. म्हणूनच वा. म. कुलकर्णी यांनी वामन दादांना ' लोककवी' तर जनतेने त्यांना 'वामनदादा'ही पदवी बहाल केली. वामनदादांच्या धारदार व पहाडी आवाजाची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही मुक्तकंठाने प्रशंसा केली. लोककवी वामनदादा कर्डक या देशात आपल्या झंजावाती काव्यशक्ती आणि प्रतिभेने अजरामर आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने वामनदादा कर्डक भारावून गेले. त्यांनी सुरेल आवाजाने डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा विचार संपूर्ण महाराष्ट्रावर जनमानसापर्यंत पोहोचविला ते म्हणतात

'तुफानातील दिवे आम्ही, तुफानातील दिवे
तुफान वारा पाऊस धारा, मुळी आम्हा न शिवे
हल्ल्या वरती होती हल्ले | अभंग आमचे बालेकिल्ले
तसाच ताठर माथा आमचा |जळू परंतु धरती उजळू
प्रकाश तेथे तसाच उधळू |सदा चांदणी सुखे नांदणे
हेच आम्हाला हवे, तुफानातील दिवे ||

अंतकरणाने रचलेलं बेभान बाहेर पडणारे हे काव्यगीत असंख्य दलितांना चेतवण्याचे काम करीत असे तरी माणसाची मनं बदलली नाहीत. समाज परिवर्तन घडून आलं नाही. जुन्या श्रद्धा, जुने विचार पुन्हा नव्या जोमाने येऊ लागले. जातीविषमता, भेदभाव नव्या रूपात येऊ लागला इथला बळी आम्हाला बळाच्या जोरावर नागवितो. इथली पेशवाई ही माजली होती. दाद मागायची कुणाला? अजून पूर्वीच्या कळाची खून बुजली नाही तोवर नव्याने हा त्रास होऊ लागला. हे दलित यांच्या मधील मर्मभेदक चित्रण कवी वामन कर्डक करून जातात. ते म्हणतात, 'आता आपणास थोडीशी चीड यायला हवी जो अन्याय सोसत

असतो तोच खरा दोषी असतो. आपल्या आई-बहिणीला ठाई ठाई नागविले जाते तरी आपणास राग येत नाही. आपणच आपल्या अब्रूची विटंबना पाहतो आहे. आपल्यावरील अन्याय दूर कर. म्हणून दलित माणसा, जागा हो अन्यायावर तुटून पड'.

वामनदादा कर्डक यांची गाणी त्यावेळच्या प्रत्येक माणसाच्या घराघरात पोहोचली होती साधी-सरळ रचना उत्तम पण भारदार आवाज यामुळे वामनदादा कर्डक त्याकाळात लोकप्रिय कवी व गायक म्हणून प्रसिद्ध होते.

आंबेडकरांच्या शिक्षणाच्या मंत्राने समग्र दलित वर्ग जागा झाला होता आणि वामनदादा कर्डक यांनी तर त्यांचा विचार शाहिरीच्या अंगाने तो घराघरात पोहोचवला होता.

'घरधनी मी सांगते तुम्हाला
माझ्या पेंदयालाशाळेत घाला'

आपण दारिद्र्यात दिवस काढले, आपल्या मुलांना तरी शिकून-सवरून मोठं करूया. मी त्यांच्या शाळेसाठी कितीही कष्ट करेन. तुमची फाटकी पैरण पुन्हा शिवून देईन. माझ्या लुगड्याला दंड घालीन, मला दागिने नकोत, मला कपडे नकोत, फक्त माझ्या पेंद्याला शाळेत घालून त्याला मोठा करूया. हे एवढं मोठं स्वप्न ती माता पाहते. वामनदादा कर्डक त्याचे वर्णन खालील प्रमाणे करतात.

'समाजाचं फेडाया ऋण |बाळ माझा घेईल शिक्षण
व्हईल वकील जय भीमवाला | माझ्या पेंद्याला शाळेत घाला'

शिकून मोठे होऊन आपल्या समाजाचे ऋण फेडणे ही काळाची गरज होती. वामनदादा कर्डक यांनी दलित कवितेला निश्चितच पाठबळ दिले आहे. शिवराम कांबळे, किसन भागोजी बनसोडे पर्यंतच्या सर्व कार्यकर्त्यांनी सुधारणावादी विचारांनी काव्य रचले, त्याचे गायन केले. ही सर्व मंडळी तडफदार वृत्तीची होती. सुधारणावादी जागृत कवी म्हणून त्यांना तो काळ ओळखत असे. या सर्वांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच श्रद्धास्थान होते. त्यांच्या विचाराचा धागा पकडून ते लोककवी धर्म व्यवस्थेवर हल्ला चढवीत होते. जातिव्यवस्थेवर तुटून पडत आणि म्हणत, 'तुफानातील दिवे आम्ही तुफानातील दिवे' त्यांचा आत्मशोध आणि सन्मान तेजाळू लागला शब्द प्रामाण्य झुगारून देऊन बुद्धिप्रामाण्यवाद वाढीस लागला.

पारतंत्र्याच्या काळात अंधार गेला आणि स्वातंत्र्याचा सूर्य उगवला तरी ही भारतीयांची अस्पृश्यतेबद्दल मने बदलली नाहीत. स्वातंत्र्याच्या नावाखाली दलित माणूस जास्तच भरडला गेला होणारे मोठे झाले. कारखाने, नवे बंगलेआले . दलितांच्यामध्ये काहीच बदल झाला नाही, हे कठोर वास्तव सत्य वामनदादा कर्डक यांनी सांगितले आहे स्वातंत्र्य आल्यावर दलितांच्या मध्ये काही सुधारणा होतील असे वाटले परंतु काहीच झाले नाही हे विदारक सत्य वामनदादा कर्डक मांडतात.

ज्याप्रमाणे किसन फागुजी बनसोड यांनी शतकाच्या सुरुवातीला दलित समाजाची जी व्यथा मांडली तीच व्यथा वामनदादा कर्डक यांनी आपल्या कवितेतून मांडली. त्यात काही बदल झाला नाही म्हणून वामनदादा कर्डक आपली लेखणी - वाणी झीजवतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार पुन्हा रुजवण्याचे काम ते करताना दिसतात डॉ. आंबेडकर यांना त्यांनी डोळे भरून पाहिले होते. त्यांचा विचार म्हणजे वामनदादा कर्डक यांना एक विसावा वाटतो ते म्हणतात, 'बाबा तुम्ही जे आमच्यात पेरलं ते आता उगवून तरारून आलंआहे . उभं शेत हिरवंगार झालं आहे. '

'भीमा
तुवा पेरलेलं तरारून आले| उभं शेत हिरवे नवे रूप ल्याले
तुझी आण भांकू खडे आज टाकू| तुझे रान राखू आणि सुख चाखू
सुखाचाच ठेवा मिळावा महान | तुझ्या लेकरांना आता काय वाण'

अशी अंतर्यामी उसळून येते. डॉ. आंबेडकरांनी गुलामगिरीचे साखळदंड पायातील मणाच्या बेड्या तोडून टाकल्या. त्यांनी दलित माणसांना मुक्त केले भगवान बुद्धाचा बौद्ध धर्म स्वीकारून, नऊ कोटी दलितांना सन्मान दिला. हा सर्व आशय वामनदादा कर्डकांनी आपल्या रचनेत मांडला आहे. त्यांचे कर्तृत्व, त्यांचा स्वाभिमान, त्यांची धडाडी ही कर्डकांनी आपल्या कवनात सतत रचून, गायिले आहे. ते म्हणतात, 'आता भीमराव नाहीत. ते गेले. पण आपण सर्व एकोप्याने वागू या. त्यांची आपण सर्व लेकरं आहोत. आपले डोळे पुसणारा तो भीम नाही म्हणून आपण आता सतर्क होऊ या. तुफानातील दिवे होऊन

ऊन, वारा, पाऊस यास भीक न घालता मार्गक्रमण करू या. असा संदेश त्यांची कविता देते

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सामान्य जनतेपर्यंत त्यांच्याच भाषेत पोहोचविण्याचे महत्वपूर्ण काम लोककवी वामनदादा कर्डक यांनी केले. यांतून त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा प्रेरणादायी विचार सांगत पददलिताातील माणूसपण जागवले. डॉ. आंबेडकरांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करताना ते लिहितात, 'जखडबंद पायातील साखळदंड / तटातट तुटले तू ठोकताच बंड / झाले गुलाम मोकळे, भीमा तुझ्या जन्मामुळे' आंबेडकरी विचारांनी, प्रेरणेने आत्मभान आलेल्या दलितवर्गाला वामनदादा कर्डक आपल्या गीतांमधून आव्हान करतात की,

'शुद्ध संस्कृतीच्या नावे | गाडलेली सारे गावे
वरती आणा पुन: उफाळून | सारा सागर काढा खणून ||
व्हारे सारे डोंगरलाटा | कर्मठांचा जिरवा ताठा
व्हा तुफान प्राण पिसाळून | सारा सागर काढा खणून' ||

या आव्हानातून ते भारतीय संस्कृतीवर आघात करतात. दलितांच्या अवस्थेला सामाजिक विषमता कारणीभूत आहेच पण त्याचवेळी आर्थिक विषमताही तेवढीच कारणीभूत आहे. याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे अशी वर्गीय जाणीवही तीव्रतेने त्यांच्या कवितेतून व्यक्त झालेली पहावयास मिळते. उदाहरण म्हणून सोप्या पण अर्थपूर्ण भाषेतून त्यांनी केलेली आर्थिक शोषणाची मांडणी पाहता येईल.

'नवे बंगले नवे कारखाने | निर्मियेले जर भारताने
ओझे वाहणारा ओझेच वाही | तीच जागा आम्हा तळाची

किंवा,

'घराघरात आता | बंदूकीची धाक आहे
घराघरात आता |माणसांची राख आहे
लोणी खाणारी खरी | धनिकांची जात आहे
बाकी कष्टकरी | माणसाला ताक आहे'.

यांसारख्या कवितांमधून ते सांगतात की जुनी सरंजामशाही आजनव्या रुपात सर्वसामान्यांचे जगणे अवघड करीत आहे. प्रत्यक्षात 'माणूस व माणुसकी'या तत्वावर आधारित समाज व्यवस्था अस्तित्वात यायला हवी होती पण दुर्दैवाने आजही सर्वसामान्यांना पददलितांना पूर्वीच्याच छळाला सामोरे जावे लागत आहे स्वार्थापोटी संवेदना हरवून बसलेल्या बधीर मनाच्या माणसांना ते कळवळून सांगतात

'माणसाने माणसाला छळू नये | एवढे का माणसाला कळू नये
माणसांचा देश उपाशी असताना | माणसाने तुपात रोटी तळू नये'

अशी सबुरीची भाषा ते करीत असले तरी शोषित वर्गाला शोषणाचे भान आणून दिले पाहिजे, त्यांना संघर्षाकडे वळविले पाहिजे, त्यांना ताठ मानेने जगायला शिकवलं पाहिजे, संघर्षासाठी सर्व शोषित, पिडीत वर्गाने संघटीत झाले पाहिजे, असे मनापासून त्यांना वाटत होते. याकरिताच ते देशात लढल्या गेलेल्या समतेच्या अनेक लढ्यांचा दाखला देतात

'बुद्धानंतर फुले, फुलेचा चेले आंबेडकर
क्रांती क्रांती करीत फिरला, अखंड भारतभर'

किंवा,

कोल्हापूरचा शाहू राजा | मैतर माझ्या भीमाचा
कणखर पाठीराखा होता | तोच माझ्या भीमाचा'

या देशात भगवान गौतम बुद्ध, म. फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लढे उभे केले. हे लढे एकाबाजूला वर्णसंघर्षाची तर दुसऱ्या बाजूला वर्गसंघर्षाची आवश्यकता प्रतिपादन करणारे होते. वामनदादा कर्डक आपल्या गीतांतून धार्मिकदृष्ट्या वर्ण आणि आर्थिकदृष्ट्या वर्ग या दोन्ही जाणीवांचे वास्तवरूप प्रकट करतातआणि प्रस्थापित

सामर्थ्यशाली व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवितात. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सामान्य जनतेपर्यंत पोहोचवितात.

**समारोप**

वामनदादा कर्डकांची गीते म्हणजे दलित चळवळीचा एक प्रकारचा इतिहास होय. लोकजीवनाशी एकरूप होऊन बाबासाहेबांच्या आत्मजागृतीचा संदेश वाहून नेणे हे त्यांनी आपल्या जीवनाचे आद्य कर्तव्य मानले सत्य आणि स्वातंत्र्याचा अभिन्न अविष्कार वामनदादा कर्डकांची रचना घेऊन येते. त्यामुळे त्यांच्या काव्यात कृत्रिमता आढळत नाही आवेश, विद्रोह हा त्यांच्या कवितेचा स्थायीभाव होता. लोकशाहीर वामनदादा कर्डक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आपल्या ओजस्वी वाणीतून आणि समर्थ लिखाणातून महाराष्ट्राच्या घराघरात, खेड्यापाड्यात, वाडी तांड्यात पोहोचवण्याचे काम केले गौतम बुद्ध, महात्मा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार हावामनदादांचा श्वास होता. ऊर्जा केंद्र होते हे विचार प्रभावीपणे प्रसारित करत वामनदादा जिवनाच्या शेवटपर्यंत फिरत राहिले त्यामुळे समाज जागृत होत राहिला.

**संदर्भग्रंथसूची**

१) मराठी दलित कविता :एक चिकित्सक अभ्यास – डॉ. सुनील चंदनशिवे, डिम्पल पब्लिकेशन-ठाणे.
२) परिवर्तनाचे प्रवाह – डॉ. मनोहर जाधव, पद्मगंध प्रकाशन, पुणे.
३) दलित साहित्य वेदना आणि विद्रोह – भालचंद्र फडके, श्रीविद्या प्रकाशन-पुणे.
४) दलित कविता – म. सु. पाटील, लोकवान्ड्मय प्रकाशन -मुंबई.
५) दलित साहित्याची प्रकाशयात्रा – भालचंद्र फडके, आनंद प्रकाशन, औरंगाबाद.
६) दलित कवितेतील अस्मिता – डॉ. बिरा पारसे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.

◆◆◆◆◆